क्रमांक : ५४५३ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
विधान भवन, मुंबई
दिनांक : ९ मे, २०२४

**संदर्भ** :- १) संसदीय कार्य विभाग, शा.नि.क्र.एलईजी-१०९८/प्र.क्र.५१/९८/पाच, दि.०२/१२/१९९८

२) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.८२१/क-१, दिनांक १२ जानेवारी, २०२४

**:: परिपत्रक ::**

संसदीय कार्य विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णयानुसार विधानमंडळ सचिवालयाकडून करण्यात येणारे कामकाज हाताळण्यासंदर्भात संसदीय कार्य विभागाने सर्व मंत्रालयीन विभागांना मार्गदर्शक सूचना प्रसृत केल्या आहेत. त्यामध्ये विधानसभा/ विधानपरिषद सूचना प्रश्न, तारांकित प्रश्न, अतारांकित प्रश्न. प्रस्ताव, ठराव, निवेदने, लक्षवेधी सूचना, कपात सूचना, आश्वासने, अशासकीय विधेयके व अशासकीय ठराव, स्थगन प्रस्ताव, अर्धातास चर्चा, विशेष उल्लेख, औचित्याचा मुद्दा, अल्पकालीन चर्चा, सभागृहाच्या पटलावर ठेवावयाचे वैधानिक अहवाल व अन्य बाबतीत संसदीय आयुधे कशाप्रकारे हाताळावीत याबाबत सविस्तर सूचना प्रसृत करण्यात आल्या आहेत. सदर सूचना निर्गमित करुन बराच कालावधी उलटून गेला असल्याने या सूचनांमध्ये कालानुरुप व परिस्थितीनुरूप काही बदल झाले आहेत. यास्तव संदर्भाधीन शासननिर्णय अधिक्रमित करून सुधारित शासन परिपत्रक निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याने सुधारित शासन परिपत्रकाचा मसुदा या सचिवालयाकडे पाठविण्यात आला असून त्यान्वये महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाशी संबंधित नियमामध्ये व कार्यपद्धतीत काही सुधारणा असल्यास त्याप्रमाणे मसुद्याच्या प्रारुपात आवश्यक सुधारणा करून देण्याबाबत विनंती केली होती.

त्यानुषंगाने संदर्भ क्र.२ च्या परिपत्रकान्वये विविध आयुधांच्या संबंधित नियमात व कार्यपद्धतीत काही सुधारणा असल्यास अशा सुधारणा संबंधित कक्षांनी अद्यावत करुन शुक्रवार, दिनांक २ फेब्रुवारी. २०२४ पर्यंत क-१ (आस्थापना) कक्षास पाठविण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि, अद्याप बहुतांश कक्षांकडून यासंदर्भातील माहिती अप्राप्त आहे.



MLS-DATASERVER\C Branch\1401\C-101\Local Disk (d)\E Drive\2024\GENERAL\संसदिय आयुधे\परिपत्रक-संसदिय आयुधे.docx

सबब, विविध आयुधांच्या संबंधित नियमात व कार्यपद्धतीत काही सुधारणा असल्यास अशा सुधारणा संबंधित कक्षांनी अद्यावत करुन शुक्रवार, दिनांक ३१ मे, २०२४ रोजीपर्यंत 'क-१' (आस्थापना) कक्षास उपलब्ध करुन द्याव्यात.

( सुभाष नलावडे )
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

१) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

३) मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

४) सचिव (१) (का), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

५) सचिव (२) (का), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष

६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी

७) संगणक (क-२) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

८) निवडनस्ती